# अधिदान व लेखा कार्यालय

## महाराष्ट्र शासन

PHONE NO. २६५६६३३१
e-mail : estt१-paomumbai@gov.in
लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), Fax No. ०२२-२६५११५८८
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/आस्था/एच/जडसंग्रह निर्लेखन/फा.क्र.२६-ब/ 431 दि. 24 NOV 2020

**जडसंग्रह वस्तूंची (जुनी व निकामी पोलादी तिजोरी) लिलावाने विक्री**

अधिदान व लेखा कार्यालयातील जुनी व निकामी झालेल्या पोलादी तिजोरीची लिलावाद्वारे विक्री करून निर्लेखित करावयाचे असून सदर निर्लेखनास कार्यालयीन लिलाव समितीची मान्यता मिळाली आहे. ज्या संस्थांना / व्यक्तींना सदरची जडसंग्रह वस्तू खरेदी करावयाचे आहे त्यांना सदर साहित्य दि. २४/११/२०२० ते दि. ०३/१२/२०२० या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११ ते सांयकाळी ४ या वेळेत पाहता येईल.

लिलाव विक्रीची सूचना, अटी व शर्ती www.mahakosh.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर तसेच कार्यालयाच्या वांद्रे व चर्चगेट येथील सूचना फलकावर लावण्यात आल्या आहेत. ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्था / व्यक्तींनी लिलावात सहभागी व्हावे. लिलावासाठी पाठवावयाचे आपले दर बंद पाकिटातून कार्यालयाच्या उपरोक्त पत्त्यावर दि. ०३/१२/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवावे. सदर बंद लिफाफे दि. ०४/१२/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता अधिदान व लेखा अधिकारी यांच्या पूर्व मान्यतेने उघडण्यात येतील.

(वैभव राजेघाटगे)
अधिदान व लेखा अधिकारी
तथा लिलाव समिती अध्यक्ष

Scanned by CamScanner

# अधिदान व लेखा कार्यालय

## महाराष्ट्र शासन

PHONE NO. २६५६६३३१
e-mail : estt१-paomumbai@gov.in
Fax No. ०२२-२६५९१५८८

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

वाचा:

१. औदयोगिक प्रशिक्षण संस्था मुंबई ११ यांचे दिनांक ९/११/२०२० रोजीचे पत्र
२. तिजोरी निर्लेखन समितीचा अहवाल दि.१९/११/२०२० रोजीचा अहवाल.
३. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. अले/आस्था/एच/ फा.क्र.२६-ब दि.१९/११/२०२०

---

क्र.अले/आस्था/एच/जडसंग्रह निर्लेखन/फा.क्र.२६-ब/ ५३० दि. 24 NOV 2020

### लिलाव विक्रीची सूचना

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे औदयोगिक प्रशिक्षण संस्था मुंबई यांचे पत्र, संदर्भ क्र.२ च्या तिजोरी निर्लेखन समितीचा अहवाल संदर्भ क्र.३ चा कार्यालयीन आदेशनुसार अधिदान व लेखा कार्यालयाच्या दुस-या मजल्यावरील जुनी व निकामी झालेल्या पोलादी तिजोरीची लिलावाने विक्री करावयाची आहे. सदर निकामी पोलादी तिजोरीचे दर द्यावयाचे आहेत. लिलावाचा जास्तीत जास्त देकार (दर) देणाऱ्यास निकामी झालेली पोलादी तिजोरी देण्यात येईल. ज्या संस्थेचे / व्यक्तीचे दर स्विकारण्यात येऊन स्वीकृत केले जातील, त्यातील त्यांचे दर स्वीकृत केल्यानंतर लिलावाची संपूर्ण रक्कम रोख स्वरूपात पुढील २४ तासांचे आत कार्यालयात जमा करून पुढील ४८ तासांचे आत निकामी पोलादी तिजोरी घेऊन जाणे बंधनकारक राहिल अन्यथा त्यांचे दर रद्द ठरवून निकामी सामानाची विक्री अन्य संस्थेस / व्यक्तीस करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवत आहे.

कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच, लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अवाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही. या बाबत कोणत्याही बोलीदाराने अडथळा निर्मांण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या अथवा त्यांचे विरुध्द भारतीय दंडविधान संहिता १८६० अन्वये फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्थांनी / व्यक्तींनी लिलावात सहभागी होण्यासाठी आपले दर वंद लिफाफ्यातून कार्यालयाच्या उपरोक्त पत्त्यावर दि. ०३/१२/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पर्यंत पाठवावे व लिफाफ्यावर <u>जुनी व निकामी झालेल्या पोलादी तिजोरीची विक्री</u> असे ठळकपणे नमूद करावे. प्राप्त झालेले बंद लिफाफे दि. ०४/१२/२०२० रोजी मा. अधिदान व लेखा अधिकारी यांच्या पूर्व मान्यतेने सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील तरी सहभागी संस्थांनी / व्यक्तींनी/ बोलीदारांनी विहित वेळेत कार्यालयात उपस्थित रहाण्याची खबरदारी घ्यावी.

Scanned by CamScanner

## अटी व शर्ती

१. ज्या संस्थेचा / व्यक्तीचा देकार मंजूर करण्यात येईल अशा संस्थांनी निकामी पोलादी तिजोरी कार्यालयाच्या आवारात व आवारातून बाहेर नेताना वाहतुकीचा, हमालीचा व पोलादी तिजोरी हाताळणीचा खर्च स्वत: सोसावयाचा आहे.या बाबत या कार्यालयाकडून हाताळणीच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले जाणार नाही.तसेच तिजोरीची हाताळणी करताना आपल्याकडील कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रकारची इजा जखम झाल्यास किंवा अपघात झाल्यास या कार्यालयाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.याची नोंद घ्यावी.

२. जुनो निकामी पोलादी तिजोरी कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन कामकाजात कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. निकामी सामान कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन वस्तूंची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरूपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.त्यामुळे योग्य ती खबरदारी घेणे बंधनकारक आहे.

४. जुनो निकामी पोलादी तिजोरी जेथे आहे, ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत स्विकारावी लागेल.

५. जुनो निकामी पोलादी तिजोरी कार्यालयीन आवाराच्या (Office Premises) बाहेर त्वरीत ( १० दिवसाच्या आत) घेवून जाणे बंधनकारक राहिल.

६. जुनो निकामी पोलादी तिजोरीची पाहणी दि. २४/११/२०२० ते दि. ०३/१२/२०२० या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११ ते सांयकाळी ४ या वेळेत करता येईल.

७. बोलीदाराने अथवा त्याच्या अधिनस्त कामगारांनी या कार्यालयात कोणत्याही स्वरूपाचे पान, गुटखा, तंबाखू अथवा तत्सम पदार्थांचे सेवन करण्यास तसेच बेजबाबदार वर्तणूक केल्यास मुंबई पोलीस अधिनियमान्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

८. जुनी निकामी झालेली पोलादी तिजोरी दुस-या मजल्यावरून कार्यालयाबाहेर नेताना बोलीदारांनी अथवा त्यांच्या कर्मचा-यांनी उदवाहनाचा वापर करावयाचा नाही अथवा केल्यास प्रति व्यक्ती रू.५००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

९. कोविड-१९ या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर साथरोग अधिनियम १८९७ अन्वये बोलीदारांनी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.अन्यथा रू.५००/- इतका दंड आकारण्यात येईल.

(वैभव राजेघाटगे)
**अधिदान व लेखा अधिकारी**
**तथा लिलाव समिती अध्यक्ष**

प्रत :-

१. कार्यालयीन सूचना फलक वांद्रे / चर्चगेट.
२. कार्यालयीन नस्ती.

Scanned by CamScanner